"आरोग्याच्या
सुपर स्पेशालिटी सेवा
एकाच छताखाली"

# वृत्तपत्रिका

मे २०२६

मराठवाडा मेडिकल ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट

# कमलनयन बजाज हॉस्पिटल




मराठवाड्यातील एक विश्वसनीय रूग्णालय | अद्ययावत सुविधा व वैद्यकिय उपकरणांनी सुसज्ज | अनुभवी व निष्णात डॉक्टर्स
सर्व समावेशक सुविधा एकाच छताखाली असणारे रूग्णालय | मुत्रपिंड, यकृत आणि हृदय प्रत्यारोपण साठी मान्यता प्राप्त रूग्णालय

## “महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा; ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला सोहळा.”

1 May 2026





1 मे 2026 रोजी कमलनयन बजाज हॉस्पिटल व नर्सिंग कॉलेज येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यानंतर उपस्थितांना महाराष्ट्र दिनाचे ऐतिहासिक महत्त्व, राज्याच्या प्रगतीतील योगदान आणि सामाजिक बांधिलकी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

नर्सिंग कॉलेज ऑडिटोरियममध्ये आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मराठी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गाणी, नृत्य, कविता आणि इतर कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक वेशभूषा आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

या प्रसंगी महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा गौरव करत एकात्मता, कर्तव्यनिष्ठा आणि प्रगतीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत राज्याच्या विकासासाठी आपले योगदान देण्याचा संकल्प केला. हा सोहळा कर्मचारी, विद्यार्थी आणि व्यवस्थापन यांच्यातील स्नेह व एकात्मता अधिक दृढ करणारा ठरला.

## “की हॉटेल येथे उष्माघात विषयावरील जनजागृती व्याख्यान संपन्न.”

1 May 2026





दि. 01 मे 2026 रोजी की हॉटेल येथे कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने उष्माघात (Heat Stroke) जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. अजय रोट्टे यांनी मार्गदर्शन केले.

व्याख्यानादरम्यान उन्हाळ्यात वाढणाऱ्या तापमानामुळे होणारा उष्माघात, त्याची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, पुरेसे पाणी पिण्याचे महत्त्व तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमास उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उष्माघाताबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

## “जागतिक थॅलेसेमिया दिन 2026 : आशा, उपचार आणि नवजीवनाचा उत्सव.”

8 May 2026





जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे 8 मे 2026 रोजी विशेष जनजागृती व रुग्ण सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. “रक्तसंक्रमणापासून नवजीवनाकडे – बोन मॅरो ट्रान्सप्लांटमधून आशेच्या कथा” या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात थॅलेसेमियाबाबत जनजागृती, लवकर निदानाचे महत्त्व आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांटद्वारे उपलब्ध होणाऱ्या उपचारांच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात बोन मॅरो ट्रान्सप्लांटनंतर निरोगी आयुष्य जगणाऱ्या रुग्णांच्या प्रेरणादायी अनुभवांचे कथन करण्यात आले. तसेच या यशामागील डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, बोन मॅरो ट्रान्सप्लांट टीम, आयसीयू टीम, रक्तपेढी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. उपस्थित तज्ज्ञांनी थॅलेसेमियाच्या उपचारांमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लांटची भूमिका, वेळेवर निदान आणि समाजातील जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमाद्वारे थॅलेसेमियाविरुद्धच्या लढ्यात जनजागृती, वेळेवर उपचार आणि समाजाच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. "प्रत्येक प्रत्यारोपण ही नव्या आयुष्याची सुरुवात असते" हा आशादायी संदेश कार्यक्रमातून प्रभावीपणे पोहोचविण्यात आला आणि रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना नव्या जीवनासाठी प्रेरणा देण्यात आली.

## “जागतिक ल्युपस दिनानिमित्त जनजागृती व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन”

9 May 2026






जागतिक ल्युपस दिनानिमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे 9 मे 2026 रोजी जनजागृती आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. “लवकर ओळख, वेळेवर निदान आणि उत्तम उपचार परिणाम” हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने फेसबुक लाईव्ह जनजागृती सत्र तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची शैक्षणिक बैठक आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमाद्वारे ल्युपस या स्वयंप्रतिकार (Autoimmune) आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे, लक्षणांची वेळेत ओळख पटविणे आणि योग्य उपचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वैद्यकीय तज्ज्ञांनी अद्ययावत निदान व उपचार पद्धतींवर चर्चा करून रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी ज्ञानाची देवाणघेवाण केली.

ल्युपसबाबत समाजात जागरूकता वाढविणे आणि प्रभावित रुग्णांना सक्षम पाठबळ देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. अशा शैक्षणिक व जनजागृतीपर कार्यक्रमांद्वारे कमलनयन बजाज हॉस्पिटल समाजाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्याची आपली बांधिलकी सातत्याने जपत आहे.

## “टोयोटा लिमिटेड येथे उष्माघात जनजागृती व्याख्यान संपन्न ”

11 May 2026





दि. 11 मे 2026 रोजी टोयोटा लिमिटेड येथे कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने उष्माघात (Heat Stroke) जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. अजय रोट्टे सर यांनी मार्गदर्शन केले.

व्याख्यानादरम्यान उन्हाळ्यात उष्माघात होण्याची कारणे, त्याची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, पुरेशा पाण्याचे सेवन, योग्य आहार आणि आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे उष्माघाताबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

## “आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त उत्साहपूर्ण 'नर्सेस वीक' साजरा ”

12 May 2026





आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या परिचारिका विभागातर्फे 9 मे ते 12 मे 2026 या कालावधीत 'नर्सेस वीक' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने फॅन्सी ड्रेस, गायन, नृत्य, मेहंदी, म्युझिकल चेअर आणि इतर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. परिचारिका व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कलागुणे सादर केली.

12 मे रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमात परिचारिका सेवांचे आरोग्य व्यवस्थेतील अमूल्य योगदान अधोरेखित करण्यात आले. “Our Nurses. Our Future. – Empowered Nurses Save Lives” या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या परिचारिकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, डॉ. अजय रोट्टे आणि डॉ. मिलिंद वैशणव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या उपक्रमाद्वारे परिचारिका वर्गाच्या समर्पण, सेवाभाव आणि रुग्णसेवेतील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नर्सेस वीकने सर्व कर्मचाऱ्यांमध्ये एकात्मता, उत्साह आणि व्यावसायिक अभिमानाची भावना अधिक दृढ केली.

# “राष्ट्रीय स्तरावर कमलनयन बजाज हॉस्पिटलचा गौरव”

15 May 2026







छत्रपती संभाजीनगर येथील कमलनयन बजाज हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत दोन प्रतिष्ठित National Healthcare Awards पटकावले आहेत. बंगळुरू येथे आयोजित सोहळ्यात 100 पेक्षा अधिक खाटांच्या रुग्णालयांच्या श्रेणीत हॉस्पिटलला "Excellence in Multi-Specialty Hospital Services" आणि "Excellence in Organ Transplant Program" हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, रुग्णकेंद्रित सेवा आणि अवयव प्रत्यारोपण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे हा सन्मान मिळाला. हॉस्पिटलच्या वरिष्ठ टीमने पुरस्कार स्वीकारला असून, हा यशस्वी प्रवास डॉक्टर, नर्सेस, कर्मचारी आणि रुग्णांच्या विश्वासाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस म्हणाले, "हा सन्मान केवळ आमच्या हॉस्पिटलचा नसून संपूर्ण मराठवाड्याचा अभिमान आहे. या गौरवामुळे अधिक गुणवत्तापूर्ण आणि जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा देण्याची आमची बांधिलकी आणखी दृढ झाली आहे."

या राष्ट्रीय सन्मानामुळे कमलनयन बजाज हॉस्पिटलने महाराष्ट्रातील अग्रगण्य रुग्णालयांमध्ये आपले स्थान अधिक भक्कम केले असून, हा गौरव संपूर्ण मराठवाड्यासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.

# “मॅट्रिक्स लाइफ सायन्स लिमिटेड येथे 'निरोगी जीवनशैली' विषयावर व्याख्यान संपन्न”

15 May 2026





दि. 15 मे 2026 रोजी मॅट्रिक्स लाइफ सायन्स लिमिटेड येथे कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने 'निरोगी जीवनशैली (Healthy Life)' या विषयावर जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. अंतरा देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

व्याख्यानादरम्यान संतुलित आहार, नियमित व्यायाम, तणाव व्यवस्थापन, पुरेशी झोप तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयी अंगीकारून विविध आजारांपासून बचाव कसा करता येईल याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामुळे आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

# मोफत

## गरोदरपणातील तपासणी (ANC) OPD

## दर गुरुवारी

सकाळी 10:00 ते दुपारी 04:00

सुरुवात

**28 मे 2026 पासून**



प्रत्येक आईला आयुष्याची सर्वोत्तम सुरुवात मिळायलाच हवी.

**10% सवलत**
निवडक तपासण्यांवर

मार्गदर्शन

**डॉ. वेदत्रयी देशमुख**

वरिष्ठ सल्लागार, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ

### मोफत सेवा

- ANC सल्ला
- रक्तदाब तपासणी
- वजन तपासणी
- गर्भारपण समुपदेशन
- आहार व जीवनशैली मार्गदर्शन
- गरोदरपणातील प्राथमिक जोखीम तपासणी

### निवडक तपासण्यांवर सवलत

- CBC
- ब्लड शुगर
- थायरॉईड प्रोफाइल
- सोनोग्राफी
- युरिन तपासणी
- Hb
- व्हिटॅमिन D / B12
- अँटेनटल पॅनेल्स

अनुभवी स्त्रीरोग तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

अत्याधुनिक सुविधा

संवेदनशील व वैयक्तिक काळजी

आई व बाळासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह हॉस्पिटल

**अपॉइंटमेंटसाठी संपर्क** 022 6623 2222, 90049 33444

STAY CONNECTED

Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital www.bajajhospital.com

## “टाकळी मुर्तड येथे मोफत हृदयरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद”

16 May 2026





दि. 16 मे 2026 रोजी जालना जिल्ह्यातील टाकळी मुर्तड येथे कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने मोफत हृदयरोग तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये डॉ. रंजीत पालकर यांनी हृदयविकार, त्याची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, संतुलित आहार, नियमित व्यायाम व निरोगी जीवनशैली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित नागरिकांची हृदयविकारासंदर्भातील प्राथमिक तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला.

या शिबिराचा लाभ एकूण 400 नागरिकांनी घेतला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे शिबिर सुरळीत व यशस्वीरीत्या पार पडले. अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होत असून भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## “धूत ट्रान्समिशन लिमिटेड, शेंद्रा एमआयडीसी येथे तणाव व्यवस्थापन विषयावरील व्याख्यान संपन्न”

21 May 2026






दि. 21 मे 2026 रोजी धूत ट्रान्समिशन लिमिटेड, शेंद्रा एमआयडीसी येथे कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने 'तणाव व्यवस्थापन (Stress Management)' या विषयावर जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. अजय रोट्टे सर यांनी मार्गदर्शन केले.

व्याख्यानादरम्यान कामाच्या ठिकाणी निर्माण होणारा तणाव, त्याचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम तसेच तणाव नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. नियमित व्यायाम, संतुलित आहार, सकारात्मक विचार आणि योग्य जीवनशैलीच्या माध्यमातून तणावावर मात कशी करता येईल याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

## “कमलनयन बजाज हॉस्पिटल व कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट यांच्यात सामंजस्य करार”

21 May 2026





आरोग्यसेवा आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट (KTI) यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. हा करार शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रांमधील सहकार्य अधिक बळकट करण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना आणि प्रशिक्षणार्थींना आरोग्यसेवा क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान, कौशल्य विकास आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच, दोन्ही संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून भविष्यात विविध शैक्षणिक, प्रशिक्षण व कौशल्यवर्धन उपक्रम राबविण्यासाठी भक्कम पाया निर्माण होणार आहे.

या सामंजस्य कराराद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास आणि समाजोपयोगी आरोग्यसेवा यांना प्रोत्साहन देण्याच्या दोन्ही संस्थांच्या बांधिलकीला अधिक बळकटी मिळाली आहे.

## “'ब्रेस्ट कॅन्सर फ्री CSN' उपक्रम : महिलांच्या आरोग्यसुरक्षेसाठी कमलनयन बजाज हॉस्पिटलचे महत्त्वपूर्ण पाऊल”

21 May 2026





मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली कमलनयन बजाज हॉस्पिटलने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (CSN) क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील महिलांमध्ये स्तन कर्करोगाचे लवकर निदान व तपासणी करण्यासाठी 'ब्रेस्ट कॅन्सर फ्री CSN' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सादर केला आहे.

या प्रकल्पांतर्गत स्तन कर्करोगाबाबत जनजागृती, नियमित तपासणी आणि प्रारंभिक अवस्थेत निदान यावर विशेष भर दिला जाणार आहे. या उपक्रमाचे महापौर श्री. समीर राजूरकर यांनी स्वागत करत महानगरपालिकेकडून पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली. प्रकल्पाच्या पहिल्या तीन महिन्यांच्या पायलट टप्प्यात 2,500 हून अधिक महिलांना लाभ होण्याची अपेक्षा असून हा उपक्रम पुढील एक वर्ष सुरू राहणार आहे.

महिलांचे आरोग्य अधिक सुरक्षित आणि सुदृढ करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारा हा उपक्रम समाजाभिमुख आरोग्यसेवेप्रती कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या बांधिलकीचे आणखी एक प्रेरणादायी उदाहरण ठरणार आहे.

## “कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि हयात प्लेस यांच्यात सामंजस्य करार; आरोग्यसेवा आणि आतिथ्य क्षेत्राचा संगम”

25 May 2026



रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना अधिक सुसज्ज, आरामदायी आणि सर्वसमावेशक सेवा देण्याच्या उद्देशाने कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि हयात प्लेस (Hyatt Place) यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. या भागीदारीमुळे जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा आणि उत्कृष्ट आतिथ्य सेवांचा संगम साधत रुग्णांच्या उपचार प्रवासाचा अनुभव अधिक सकारात्मक आणि सोयीस्कर होणार आहे.

या सहकार्याद्वारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयाच्या आत आणि बाहेरही दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. वैद्यकीय उत्कृष्टता आणि प्रीमियम हॉस्पिटॅलिटी यांची सांगड घालत ही भागीदारी रुग्णकेंद्रित सेवांचा नवा मापदंड निर्माण करणार असून, वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

हा सामंजस्य करार कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या नाविन्यपूर्ण आणि सर्वांगीण आरोग्यसेवेच्या दृष्टीकोनाचे प्रतीक असून, रुग्णांच्या एकूण अनुभवात गुणवत्ता, सुविधा आणि समाधान वाढविण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## “कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये दोन सुपर स्पेशालिटी न्युरो क्लिनिक्सचा शुभारंभ”

26 May 2026





न्युरोलॉजिकल आजारांचे लवकर निदान, प्रभावी उपचार आणि दर्जेदार पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे स्ट्रोक क्लिनिक आणि मूव्हमेंट डिसऑर्डर क्लिनिक या दोन सुपर स्पेशालिटी न्युरो क्लिनिक्सचा शुभारंभ करण्यात आला. या क्लिनिक्सद्वारे स्ट्रोक, पार्किन्सन्स, डिस्टोनिया, हात-पाय थरथरणे, चालण्यात असंतुलन तसेच इतर न्युरोलॉजिकल विकारांवर तज्ज्ञांकडून विशेष उपचार व मार्गदर्शन दिले जाणार आहे.

या क्लिनिक्सच्या माध्यमातून रुग्णांना न्युरोलॉजिस्ट, स्पीच थेरपिस्ट, फिजिओथेरपिस्ट आणि पुनर्वसन तज्ज्ञ यांची एकत्रित सेवा उपलब्ध होणार असून, रुग्णांच्या सर्वांगीण पुनर्वसनावर विशेष भर दिला जाणार आहे. अत्याधुनिक उपचार पद्धती, वेळेवर निदान आणि सततच्या फॉलो-अपद्वारे रुग्णांना अधिक चांगले आरोग्य आणि जीवनमान मिळवून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

हा उपक्रम कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या प्रगत न्युरोसायन्स सेवांना अधिक बळकट करणारा असून, मराठवाड्यातील रुग्णांसाठी विशेष न्युरोलॉजिकल उपचार आणि पुनर्वसनाची नवी दिशा ठरणार आहे.

## “लोकमत कार्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर व मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न”

28 May 2026





दि. 28 मे 2026 रोजी लोकमत कार्यालयात कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर व आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. समीर महाजन यांनी उपस्थितांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत ईसीजी (ECG), रक्तातील साखर तपासणी (RBS) तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर आवश्यक वैद्यकीय सल्लाही देण्यात आला.

या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामुळे नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेण्याची संधी मिळाली तसेच विविध आजारांबाबत जनजागृती झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

## “यशस्वी शस्त्रक्रियेमुळे जालन्यातील रुग्णाला मिळाला नवजीवनाचा दिलासा”



जालना येथील श्री. रामाकांत दाबढकर हे दीर्घकाळापासून पोटदुखीच्या त्रासाने ग्रस्त होते. त्यांनी जालना येथील अनेक रुग्णालयांमध्ये उपचार घेतले होते. तपासणीदरम्यान डॉ. हरीश यांनी सीटी स्कॅन करण्याचा सल्ला दिला. सीटी स्कॅनमध्ये पोटामध्ये गाठ (नॉट) असल्याचे निदान झाले. शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे समजल्यानंतर त्यांनी पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील कमलनयन बजाज हॉस्पिटल गाठले.

येथे त्यांनी डॉ. सारंग अग्निहोत्री आणि डॉ. कल्याणसिंग गोठवाल यांची भेट घेतली. डॉक्टरांनी रुग्णाची सविस्तर तपासणी करून त्यांना तातडीने कॅज्युअल्टी विभागात दाखल केले. आवश्यक वैद्यकीय उपचार आणि तपासण्या पूर्ण करून दुसऱ्याच दिवशी शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले.

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली आणि श्री. दाबढकर यांना दीर्घकाळाच्या त्रासातून मोठा दिलासा मिळाला. त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, वेळेवर उपचार आणि संवेदनशील काळजीबद्दल कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.